जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ ५१५/२०२०

**प्रेसनोट** दिनांक - ०६/०२/२०२०

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी या बाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या पोलीस उपआयुक्त वाहतूक शाखा पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात दि.०८/०२/२०२० ते दिनांक २२/०२/२०२० पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात. नागरिकांच्या सूचना व हरकती विचार करून व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून तार्त्पुता स्वरुपात आदेश काढण्यात येत आहे.

**<u>चाकण वाहतुक विभाग अंतर्गत</u>**

१) **प्रायोगिक तत्वावर निर्बंध घालणेत येणारा पहिला मार्ग** : तळेगाव येथून इंदोरी टोल नाका मार्गे खलुंब्रे — एच पी चौक - म्हाळुंगे चौक - वाघजाई नगर सहारा सिटी — खराबवाडी — तळेगाव चौक शिक्रापूर रोड मार्गे माणिक चौक — कडाची वाडी - रासे भोसे - साबळेवाडी (बहुळगाव) मार्गे येणा-या व जाणा-या सर्व अवजड वाहनांना सकाळी ०७:०० ते रात्रौ २०:०० वाजेपर्यंत रोडवर येण्यास मनाई करणे आवश्यक आहे.

**सदर वाहनांची पर्यायी पार्कींग व्यवस्था** — १. इंदोरी टोल नाक्याकडून येणा-या सर्व अवजड वाहनांकरीता इंदोरी टोल नाका येथील मोकळे जागेत वाहन पार्कींग करता येईल. २.अहमदनगर कडून येणा-या सर्व अवजड वाहनांकरीता शेल पिंपळगाव व त्याचे पलिकडे मोकळया जागेमध्ये पार्कींग व्यवस्था आहे.

२) **प्रायोगिक तत्वावर निर्बंध घालणेत येणारा दुसरा मार्ग** :चाकण वाहतूक विभागातील वाकी बुद्रुक - आंबेठाण चौक — चाकण तळेगाव चौक - आळंदी फाटा — करुळी फाटा — चिंबळी फाटा मार्गे पुणे — नाशिकरोड मार्गे येणा-या व जाणा-या सर्व अवजड वाहनांना सकाळी ०७:०० ते रात्रौ २०:०० वाजे पर्यंत रोडवर येण्यास मनाई करणे आवश्यक आहे.

**सदर वाहनांची पर्यायी पार्कींग व्यवस्था** — १.पुणे नाशिकरोड वरील नाशिक कडून येणारी सर्व अवजड वाहनांकरीता अवसरी घाट ते खेड घाट दरम्यान मोकळया जागेत वाहन पार्कींग करता व्यवस्था आहे.

३) **प्रायोगिक तत्वावर निर्बंध घालणेत येणारा तिसरा मार्ग** -:चाकण वाहतूक विभागातील आळंदी येथून - आळंदी घाट मार्गे येणा-या सर्व अवजड वाहनांना सकाळी ०७.०० ते रात्रौ २०.०० वाजे पावेतो रोडवर येण्यास मनाई करणे आवश्यक आहे.

**सदर वाहनांची पर्यायी पार्कींग व्यवस्था** :- आळंदीकडून चाकण - आळंदी घाट मार्गे येणा-या सर्व अवजड वाहनां करीता आळंदी घाट दरम्यानच्या मोकळया जागेत वाहन पार्कींग करता येईल.

४) **प्रायोगिक तत्वावर निर्बंध घालणेत येणारा चौथा मार्ग** -: चाकण कंपन्यामधील एम.आय.डी.सी. माल वाहतुक करणारे सर्व अवजड वाहनाना सकाळी ०७:०० वा. ते रात्रौ २०:०० वा. पर्यत रोडवर येण्यास मनाई करणे आवश्यक आहे.

**सदर वाहनांची पर्यायी पार्कींग व्यवस्था** -: चाकण एम.आय.डी.सी. कंपण्यामधील माल वाहतुक करणारे सर्व अवजड वाहनांना एम.आय.डी.सी.अंतर्गत मोकळा येणारा भुखंड येथे पार्किंगची व्यवस्था करता येईल.

Scanned by CamScanner

वरील प्रमाणे चाकण वाहतुक विभाग अंतर्गत येणा-या व जाण-या वाहनांकरीता वरील मार्गावर सैकाळी ०७:०० वा. ते रात्रो २०:०० वा. पर्यत रोडवर अवजड वाहने येण्यास प्रायोगिक तत्वावर प्रतिबंध करण्यात येत आहे.

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा
पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरिक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **चाकण** वाहतुक विभाग

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, देहुरोड कंन्टोन्मेंट बोर्ड

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned by CamScanner